महात्मा गांधी मिशन विद्यापीठ, छ. संभाजीनगर

मानव्य विद्याशाखे अंतर्गत मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)

पदवीकरिता सादर करण्यात आलेल्या शोध प्रबंधाचा अंतिम गोषवारा

संशोधन शीर्षक

विदर्भातील निवडक लेखिकांच्या कथांमधील स्त्री-पुरुष प्रतिमांचा अभ्यास
(कालखंड २००० ते २०२०)

संशोधक

सौ. उन्नती संजय चौधरी

मु.पो. खिरोदा, ता. रावेर, जि. जळगाव

संशोधन मार्गदर्शक

प्रा.डॉ. राम गायकवाड

सहायक प्राध्यापक, भारतीय आणि विदेशी भाषा विभाग, एमजीएम विद्यापीठ, छ.संभाजीनगर

सप्टेंबर - २०२५

➢ प्रस्तावना

अव्वल इंग्रजी कालखंडापासून मराठी वाङ्मयाचे विविध प्रकार निर्माण होत असतांना महाराष्ट्रातील त्या त्या प्रदेशातून लेखकांनी त्यांच्या प्रादेशिक व सांस्कृतिक जीवनाचे अनुभव कथाबद्ध केलेले दिसून येतात. स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळत गेल्यामुळे त्यांनीदेखील त्यांचे जीवनानुभव साहित्यातून मांडलेले आहेत. तेव्हा त्यांच्या कथासाहित्यातून कौटुंबिक व सामाजिक जीवनाबरोबरच त्यांच्या प्रदेश-परिसराचे दर्शन घडते; म्हणून या ठिकाणी विदर्भातील लेखिकांच्या कथांचा चिकित्सक अभ्यास स्री-पुरुष प्रतिमांच्या दृष्टिकोनातून केलेला आहे. त्यातील स्री-पुरुषांचे वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवन समजून घेऊन त्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या त्यांच्या प्रतिमांचा शोध घेतलेला आहे. संशोधन पद्धतीनुसार त्याबाबतचे विश्लेषण प्रबंधात केलेले आहे.

➢ संशोधनाची उद्दिष्टे

१) वैदर्भीय समाज, संस्कृती व साहित्याचा स्थूल परिचय करून देणे.

२) वैदर्भीय साहित्य परंपरेतील लेखिकांचे योगदान स्पष्ट करणे.

३) वैदर्भीय लेखिकांच्या कथांमधील स्त्री-पुरुष प्रतिमांच्या दृष्टिकोनातून विविध आशय-विषयाचे विश्लेषण करणे.

४) वैदर्भीय लेखिकांच्या कथांमधील स्त्री-पुरुष प्रतिमांची समाजशास्त्रीय पद्धतीने चिकित्सा करणे.

५) वाङ्.मयीन मूल्यमापन करतांना मराठी कथासाहित्यातील स्त्री-पुरुष चित्रणाच्या संदर्भात वैदर्भीय कथालेखिकांचे स्थान, योगदान व वेगळेपण स्पष्ट करणे.

६) प्रस्तुत लेखिकांच्या कथांचा सामाजिक व वाङ्.मयीन अभ्यास करणे.

➢ गृहितके

१) भारतीय समाजव्यवस्था विषमतेवर आधारलेली असून स्त्री-पुरुषांबाबत समाजात लिंगभाव (जेंडर) आढळून येतो.

२) समाजात घडविल्या गेलेल्या लिंगभावाचे चित्रण भारतीय साहित्यासह मराठी साहित्यातही येते.

३) विदर्भातील लेखिकांच्या कथांमधून लिंगभावावर आधारलेले अनुभवविश्व साकार झालेले आहेत.

४) वैदर्भीय लेखिकांच्या कथांमधून स्त्रीत्त्व आणि पुरुषत्त्वाच्या रूढ कल्पना मांडलेल्या जाणवतात.

५) वैदर्भीय लेखिकांच्या कथांमधून स्त्रीवाद व पुरुषभान यांचे आकलन करून घेता येते.

➢ संशोधन पद्धती

वैदर्भीय लेखिकांच्या अनुभवाच्या अभिव्यक्तीचे स्वरूप समजून घेण्यासाठी अनुभवनिष्ठ संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. स्त्री आणि पुरुष हे समाजाचे आद्य व लघुत्तम घटक असल्याने त्यांच्याविषयीचे कथारूप कार्यकारणभावासह समजून घेण्यासाठी समाजशास्त्रीय समीक्षा व संशोधन पद्धत समजून घेतली

आहे. त्याचबरोबर वाड्.मयीन मूल्यमापन करताना रूपबंधात्मक समीक्षा उपयोगी ठरलेली आहे. प्रस्तुत विषयाची मांडणी करताना वर्णनात्मक, विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचादेखील वापर करण्यात आलेला आहे.

- **अभ्यासाची साधने**

संशोधन अभ्यासासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्रोत वापरण्यात आलेले आहेत. प्राथमिक स्रोत म्हणून विदर्भातील निवडक लेखिकांच्या कथासंग्रहांचे संकलन केलेले आहे आणि दुय्यम स्रोत म्हणून मराठी विश्वकोश, नियतकालिक अंक, समीक्षाग्रंथ, संशोधनपर ग्रंथ, शोध प्रबंध, साहित्य सूची, संकेत स्थळावरील लेख, यांसारखी संदर्भ साधने अभ्यासलेली आहेत. दोन्हीही संदर्भ साधानांच्या वर्गवारीच्या अनुषंगाने प्रबंधाच्या प्रकरणांची मांडणी केलेली आहे.

- **संशोधन विषयाची उपयुक्तता**

संपूर्ण जगामध्ये आधुनिक काळापासून स्त्रीसुधारणावादी विचारांचा प्रसार व प्रचार होऊन स्त्रीवादी भूमिका समाजमनात रुजविण्याचे प्रयत्न केले गेले. स्त्रीला व्यक्तीसारखं जगू देणे आणि तिच्याकडे सन्मानाने पाहणे, पुरुषाइतकेच समाजात स्थान प्राप्त होणे, यासाठी अनेक कारणांनी विविध भूमिका आजपर्यंत विचारवंत व अभ्यासकांनी मांडलेल्या आहेत; परंतु समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन पूर्णपणे बदललेला आहे, असे समाजात चित्र दिसत नाही. याचबरोबर समाजामध्ये लहानपणापासून पुरुषांची एक श्रमिक म्हणून प्रतिमा घडवली जाते.

नंतर तो कुटूंबकर्ता बनतो, अशा वेळेला त्याच्या भूमिकांवर कुटूंब व समाज यांचे नियंत्रण असते. त्यांच्या दबावामुळे त्याचे काही प्रश्न निर्माण झालेले असतात; म्हणून अशा प्रकारच्या पुरुषप्रतिमा स्त्रीप्रतिमेबरोबरच अभ्यासल्या गेलेल्या आहेत. या अभ्यासाने स्त्री-पुरुष जीवनाचा परिचय नव्याने घडून येईल आणि एका उन्नत समाजासाठी हे संशोधन उपयुक्तत ठरेल.

विदर्भासारख्या विशिष्ट प्राकृतिक व सांस्कृतिक प्रदेशाची ओळख असलेल्या प्रदेशाचा तेथील समाजजीवनासह परिचय होण्यास मदत होईल. स्त्री-पुरुष प्रतिमांच्या चिकित्सापूर्ण मांडणीने स्त्रीवादाबरोबरच पुरुषभानाविषयीची माहिती समाजास व अभ्यासकांना मिळेल. अलीकडे काही विद्यापीठांमध्ये लिंगभाव व मराठी साहित्य, असा अभ्यासक्रम लावण्यात आलेला आहे. त्यासंबंधीत विद्यार्थी, अभ्यासक व प्राध्यापक यांनाही या विषयाचा उपयोग होईल.

- **प्रकरण नियोजन**

'विदर्भातील निवडक लेखिकांच्या कथांमधील स्त्री-पुरुष प्रतिमांचा अभ्यास (कालखंड २००० ते २०२०)' या संशोधन विषयाची प्रबंधरूपाने मांडणी करण्यासाठी संशोधनविषयक शीर्षकातील विदर्भ, लेखिका, कथा, स्त्री-पुरुष आणि प्रतिमा, अशा शब्दसंकल्पना लक्षात घेऊन प्रकरणांची रचना केलेली आहे. पूर्व-नियोजित संशोधन अभ्यासाच्या रुपरेखेप्रमाणे खालील प्रकरणे प्रबंधात समाविष्ट करण्यात आलेली आहेत. इथे त्यांचा थोडक्यात परिचयदेखील करून दिलेला आहे.

प्रकरण पहिले : **वैदर्भीय समाज व साहित्य**

विदर्भातील लेखिकांच्या कथांमधून स्त्री-पुरुष प्रतिमांचा शोध घ्यायचा असल्याने त्याची पार्श्वभूमी म्हणून वैदर्भीय समाजाचा स्थूल परिचय करून देणे अनिवार्य ठरते. त्याचबरोबर वैदर्भीय समाज हा महाराष्ट्राचा पर्यायाने भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य लघुत्तम असा घटक आहे; म्हणूनच भारतीय संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर वैदर्भीय समाज आणि एकूणच भारतीय स्त्री-पुरुषांचे जीवन यांचा परस्पर अन्वयार्थ लावलेला आहे. प्रस्तुत संशोधन विषयाला नेमकेपणे समजून घेऊन त्याची योग्य मांडणी करता यावी, यासाठी प्रबंधात हे पहिले प्रकरण समाविष्ट करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये भारतीय धर्म, शिक्षण, अर्थकारण, राजकारण, कुटूंब-व्यवस्था आणि विवाहसंस्था, अशा काही सांस्कृतिक घटकांचा थोडक्यात आढावा घेऊन वैदर्भीय समाजावर त्याचा पडलेला प्रभाव स्पष्ट केलेला आहे. त्या अनुषंगाने विदर्भाची भौगोलिक, ऐतिहासिक, राजकीय पार्श्वभूमी आणि समाजजीवनासह साहित्यपरंपरेचा आढावा संदर्भासह घेतलेला आहे. तसेच स्त्री-पुरुष प्रतिमांचा अभ्यास करत असल्याने याच प्रकरणामध्ये प्रतिमेची संकल्पना स्पष्ट करून तिचे स्वरूप सांगितलेले आहे आणि त्याआधारे भारतीय समाजात स्त्री-पुरुष प्रतिमांची विविध अंगाने जडणघडण कशी केली जाते आणि त्याकडे समाज कसा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहतो, याचेही विश्लेषण केलेले आहे. या पार्श्वभूमीवर विदर्भातील लेखिकांच्या कथांमधील स्त्री-पुरुष प्रतिमांचा अभ्यास करण्यासाठी समाज व साहित्याचा अनुबंध लक्षात घेऊन खालील प्रकरणे तयार केलेले आहेत.

प्रकरण दुसरे : वैदर्भीय लेखिकांच्या कथांमधील स्त्री-पुरुषांचे कौटुंबिक जीवन

भारतीय समाजात कुटूंबसंस्थेला प्रामुख्याने महत्त्व दिलेले आहे; परंतु भारतीय समाजाची रचना विषम असल्याने जातीपरत्वे कुटूंबव्यवस्थादेखील वेगवेगळ्या आहेत. त्यांच्या सूक्ष्म अशा रूढी-परंपरा आहेत, असे असले तरी पुरुष हा कुटूंबप्रमुख असतो. एकत्र कुटूंब आणि बीजकुटूंब, अशा दोन्ही प्रकारांमध्ये वेगवेगळ्या नात्यांनी कुटूंबसदस्य जुळलेले असतात. कुटूंबव्यवस्था पितृसत्ताक असल्याने पुरुषाच्या परवानगीशिवाय इतर सदस्यांना कुठलेही निर्णय घेता येत नाहीत. अलीकडे कुटुंबामध्ये ताणतणाव निर्माण झाल्याने कुटूंबव्यवस्था विस्कळीत होऊ पाहत आहे, अशाप्रकारची कौटुंबिक वस्तुस्थिती लक्षात घेऊन कुटुंबातील स्त्री-पुरुष प्रतिमांचा शोध प्रस्तुत लेखिकांच्या कथांमधून घेतलेला आहे. त्याच्या विश्लेषणासाठी कथेतील संदर्भ घेऊन स्पष्टीकरण केलेले आहे. त्यामध्ये पती-पत्नी हे कुटुंबातील आद्यघटक आणि त्यांच्याशी जोडलेले इतर नातेवाईक, या प्रतिमांचे विश्लेषण प्रस्तुत प्रकरणात केलेले आहे. त्यातून स्त्री-पुरुष प्रतिमांचे अनोखे विश्व साकार झालेले दिसून येते.

प्रकरण तिसरे : वैदर्भीय लेखिकांच्या कथांतील समाजजीवन

भारतातील विविध राज्यांच्या एकात्मतेतून भारतीय समाजजीवन बनलेले आहे. ते सांस्कृतिक मूल्यांसह विदर्भाशीही जवळचे नाते प्रस्थापित करणारे आहे. त्या एकूणच समाजजीवनाला अनेक प्रकारच्या रूढी, प्रथा, परंपरा, श्रद्धा, समजुती व लोकमानस यांनी साचेबद्ध बनविले आहे. त्यातून निर्माण झालेले लोकजीवन व लोकसंस्कृतीची वैशिष्ट्ये थोडाफार फरक सोडला तर सगळीकडे

एकसारखे आहेत. त्या सर्वांमध्ये विवाहसंस्था ही समाजजीवनाला घेरून राहिलेली आहे. अशाप्रकारच्या समाजजीवनाचा लेखिकांच्या लेखनावर प्रभाव पडणे स्वाभाविक आहे; म्हणून त्यांच्या कथांमधून त्याच अनुषंगाने समाजात वावरणाऱ्या स्त्री-पुरुष प्रतिमांचे चित्रण केलेले आढळून येते. सामाजिक परीप्रेक्षामध्ये वावरणाऱ्या अनेक स्त्री-पुरुष प्रतिमा या लेखिकांनी त्यांच्या कथांमधून साकार केलेल्या आहेत. त्या प्रतिमांचे कथेतून संदर्भ घेऊन त्याचे नेमकेपणाने विश्लेषण या प्रकरणात केलेले आहे.

प्रकरण चौथे : **वैदर्भीय लेखिकांच्या कथांमधील स्त्री-पुरुषांचे भावसंबंध**

भारतीय स्त्री-पुरुषांचे भावजीवन हे बहुआयामी आहे. त्यांच्या जीवनाला अनेक प्रकारच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनमूल्यांच्या मर्यादा घालून दिलेल्या आहेत. त्यामध्ये त्यांना सांकेतिक-असांकेतिक नात्यांमध्ये बांधून ठेवलेले आहे. त्यामुळे त्यांना समाजमान्य अशा विशिष्ट भूमिकाच पार पाडाव्या लागतात आणि समाजाचे भान ठेवून ते आपापले भावजीवन घडवीत असतात; परंतु सामाजिक संकेत मोडणाऱ्या स्त्री-पुरुषांना समाजाकडून त्रास होतो. विशेषतः प्रियकर-प्रेयसी, मैत्रीपूर्ण संबंध राखणारे स्त्री-पुरुष, यांच्यात कुठलेही समाजमान्य नातेसंबंध नसल्याने त्यांचे भावजीवन विस्कळीत बनते. अशाप्रकारच्या अनेक स्त्री-पुरुषांच्या प्रतिमांचे दर्शन विदर्भातील लेखिकांनी त्यांच्या कथांमधून घडविलेले आहे. त्यातून सांकेतिक व असांकेतिक नातेसंबंध लक्षात घेऊन त्याचे विश्लेषण प्रस्तुत प्रकरणात केलेले आहे. त्यासाठी कथेतून औचित्यपूर्ण असे संदर्भ देण्यात आलेले आहेत.

प्रकरण पाचवे : वैदर्भीय लेखिकांच्या कथांचे वाङ्.मयीन मूल्यमापन

प्रस्तुत प्रकरणात वैदर्भीय लेखिकांच्या कथांच्या अभिव्यक्तीचे स्वरूप समजून घेऊन वाङ्.मयीन मूल्यमापन केलेले आहे. त्यामध्ये लेखिकांच्या कथांची रचना, कथानक, वातावरण, घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा आणि भाषाशैली, यांसारख्या कथेच्या घटकांचा विचार केलेला आहे. कारण कथेचे अंतर्गत व बहिर्गत घटकद्रव्य घेऊन प्रस्तुत लेखिकांनी कथानुभवाची मांडणी कशी केलेली आहे, हे प्रस्तुत प्रकरणात आशय व अभिव्यक्तीच्या माध्यमातून संदर्भासह स्पष्ट केलेले आहे.

प्रकरण सहावे : उपसंहार

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अभ्यासांती सर्व प्रकरणांच्या समग्र मांडणीचे एक सूत्र लक्षात घेऊन प्रबंधाचा थोडक्यात सारांश सांगितलेला आहे. स्त्री-पुरुष प्रतिमांच्या अनुषंगाने अभ्यास करत असताना प्रस्तुत लेखिकांच्या सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीची पार्श्वभूमी प्रबंधाला जोडलेली आहे. भारतीय समाज आणि सांस्कृतिक मूल्ये यांच्या अनुषंगाने घडलेल्या स्त्री-पुरुष प्रतिमांचे दर्शन प्रस्तुत लेखिकांच्या कथांमधून घडते. त्याविषयीचा थोडक्यात लेखाजोखा स्वमतासह प्रस्तुत प्रकरणात मांडलेला आहे, त्यातून काही निष्कर्षदेखील काढलेले आहेत.

- **निष्कर्ष**

१) भारतीय संस्कृतीच्या प्रभावाखाली वैदर्भीय समाजाची जडणघडण झालेली दिसते.

२) सांस्कृतिक जडणघडणीपासून विदर्भात साहित्यनिर्मिती झालेली दिसून येते. त्या

परंपरेत मध्ययुगीन आणि आधुनिक काळात स्त्रियांनी सहभाग नोंदविलेला दिसतो.

३) वैदर्भीय लेखिकांनी त्यांच्या कथांमधून पती-पत्नी, विविध नाते संबंधातील माणसे,

प्रियकर-प्रेयसी, मित्र-मैत्रिणी आणि स्त्री-पुरुष यांच्या प्रतिमा त्यांच्या स्वाभाविक

प्रवृत्तीनीशी साकार केलेल्या आहेत.

४) प्रस्तुत लेखिकांनी कुटूंब, समाज, धर्म आणि इतर सांस्कृतिक घटकांच्या प्रभावाने

घडलेल्या स्त्री-पुरुष प्रतिमांचे चित्रण त्यांच्या कथांमधून केलेले आढळते.

५) वैदर्भीय लेखिकांनी कौटुंबिक आणि नातेसंबंधाविषयक आशयाची मांडणी अधिक

केलेली आहे. प्रत्येक लेखिकांच्या अभिव्यक्तीचे स्वरूप हे वेगवेगळे आहे.

६) काही लेखिकांना आशय व अभिव्यक्तीची तादात्म्यता साधता आलेली आहे. जसे-

स्नेहलता शेकापुरे, मनीषा साधू व अरुणा सबाने.

७) बऱ्याच लेखिकांनी वस्तुनिष्ठ चित्रण करण्यावर अधिक भर दिलेला आहे.उदा.

प्रतिमा इंगोले, मोहना कारखानीस, सुनीता कावळे, सुमती वानखेडे, माधुरी

आशीरगडे, कुमुद मंडलेकर आणि सुप्रिया अय्यर, यांसारख्या लेखिकांनी स्त्री-

पुरुषांच्या वास्तव जीवनावर प्रकाश टाकलेला आहे

८) मराठी साहित्याच्या क्षेत्रात स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक वैदर्भीय लेखिकांनी

साहित्याच्या सर्वच प्रकारात लेखन केलेले आढळून येते.

९) कथा निवेदनाच्या बाबतीत प्रस्तुत लेखिकांचे योगदान फार मोठे असून समाज व

संस्कृतीचे वस्तुनिष्ठ चित्रण केल्याने त्यांच्या कथेचे वेगळेपण लक्ष वेधून घेते.

१०) वैदर्भीय लेखिकांच्या कथा सामाजिक निष्ठा राखणाऱ्या असून समाज व साहित्य

यांचा परस्पर संबंध त्यातून स्पष्ट होते.

➢ परिशिष्ट्ये

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम,अशा काही साधनांचा वापर केलेला असून. त्या साधनांची सूची प्रबंधाच्या शेवटी दिलेली आहे. त्यात अभ्यासाचे आधारभूत कथासंग्रह, पूरक असे संदर्भग्रंथ, ग्रंथनाम सूची, लेखिक नामसूची आणि संकेतस्थळे, यांचा निर्देश केलेला आहे. उदाहरणार्थ -

➢ संदर्भ ग्रंथसूची

१. प्राथमिक स्रोत - (वैदर्भीय लेखिकांचे कथासंग्रह)

१)	अय्यर सुप्रिया : चांदणचुरा, पहिली आवृत्ती, नागपूर, साहित्य प्रसार केंद्र, २००५.

२)	आशिरगडे माधुरी : आईशप्पथ आणि इतर कथा, पहिली आवृत्ती, नागपूर, आकांक्षा प्रकाशन, २०१३.

३)	इंगोले प्रतिमा : येळी माय, पहिली आवृत्ती,अमरावती, सोनल प्रकाशन, २०१५.

४)	कारखानीस मोहना : पैंजण, पहिली आवृत्ती, वसई, डिंपल पब्लिकेशन, २०१७.

५)	कावळे सुनिता : उसवलेलं आभाळ, पहिली आवृत्ती, वर्धा, सुयोग प्रकाशन, . २००४.

- **दुय्यम स्रोत**

अ - समीक्षाग्रंथ, वैचारिक ग्रंथ

१.	कर्वे स्वाती, स्त्री-परिषदांचा इतिहास, प्रथम आवृत्ती, पुणे, अभिजित प्रकाशन, २०१५.

२.	कुलकर्णी रत्नाकर, भारतीय संस्कृती, प्रथमावृत्ती, पुणे, जंगम ऑफसेट, १९३७.

३.	केजकर देशपांडे प्रकाश, भारताची राष्ट्रीय संस्कृती, चौथी आवृत्ती, नवी दिल्ली, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया,२००४.

४.	कोठे प्रशांत, अचलपूरचा इतिहास, पहिली आवृत्ती,नागपूर, साहित्य प्रसार केंद्र, २०१३.

५.	गीताली मंदाकिनी, स्त्रीप्रश्न सोडवताना, प्रथम आवृत्ती, पुणे, दिलीपराज प्रकाशन, २००९.

ड - संकेतस्थळे

१ .	कुलकर्णी वंदना सुधीर, बदलत्या काळातील स्त्री-पुरूष संबंध, https://misaonline.in/badaltya-kalatil-stree-purush-sambandh, दि. ४-११-२०२३.

२.	कुलकर्णी विद्याधर पुंडलीक, https://mr.vikaspedia.in/social-welfare/93893 दि. ०१-११-२०२३.

*** *** ***

दिनांक :10/09/2025 ठिकाण : छ.संभाजीनगर



संशोधक



संशोधन मार्गदर्शक

सौ.उन्नती संजय चौधरी

डॉ.राम गायकवाड